स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. मनीष जोशी यांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिव पदी निवड झाली आहे. खान्देशाला प्रथमच हा सन्मान प्राप्त झाला असून विद्यापीठाच्या लौकिकात भर पडली आहे.

प्रा. मनीष जोशी हे १९९७ पासून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेत अध्यापक म्हणून कार्यरत असून सद्या ते प्रोफेसर आहेत. संगणकशास्त्र विभागाचे प्रमुख पद त्यांचेकडे आहे. जळगावच्या भगिरथ शाळा, नुतन मराठा महाविद्यालयात त्यांनी प्राथमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण पुण्यातून घेतले. २००८ मध्ये त्यांनी कॅनडा येथील विद्यापीठातून पोस्ट डॉक्टेरेल पूर्ण केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली चार विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली असून दोन विद्यार्थी सद्या पीएच.डी. करीत आहेत. संगणक विषयक दोन मोठे आणि एक लघुसंशोधन प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत. विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक तसेच विद्यापीठातील स्वामी विवेकानंद संशोधन केंद्राचे विभाग प्रमुख म्हणून देखील त्यांनी काम पाहिले आहे. सन २०१८ मध्ये भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने त्यांचा राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मान केला. विज्ञान लोकप्रिय होण्यासाठी त्यांनी जे अनुवादाचे काम केले त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला होता.

प्रा. मनीष जोशी यांची पाच वर्षांसाठी प्रतिनियुक्ती आहे. त्यांच्या यानिवडी बद्दल कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी प्रा. जोशी यांचा सत्कार केला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. दीपक दलाल, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २ फेब्रुवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी